**"मैत्री" कार्यालय:** फोन नं. ०२०-२५४५०८८२. नोंदणी क्र. ई २८९८ / पुणे.
Email: maitri1997@gmail.com. WEB: www.maitripune.net

**"मैत्री"** म्हणजे सामाजिक कामासाठी वेळ देणाऱ्या नागरिकांचा गट. थोडा-थोडा वेळ आपल्याला आवडेल अशा कामासाठी देणारे म्हणजे "मैत्री"स्वयंसेवक. नोकरी, व्यवसाय आणि जबाबदाऱ्या सांभाळून आपला वेळ नियमितपणे सामाजिक कामासाठी स्वयंसेवक देतात. सवडीप्रमाणे आणि आवडीप्रमाणे कोणत्याही उपक्रमाच्या गटात सामील होण्याचे इथे स्वातंत्र्य आहे. "मैत्री" चे कार्यालय पत्र व्यवहार आणि हिशोब तसेच विश्वस्त बैठका घेण्याचे काम करते. ( वेळ: सोमवार ते शुक्रवार स. १०.०० ते ५.०० पर्यंत).

"मैत्री" ही विश्वस्त संस्था नोंदणीकृत आहे. "मैत्री" न्यास सर्व उपक्रमांत सूसुत्रता यावी आणि कायदेशीर बाबींची पूर्तता व्हावी म्हणूनही काम करतो. "मैत्री" चे उपक्रम देणगीदार आणि स्वयंसेवकांच्या मदतीने चालतात. देणग्या जमा करून, पावती देऊन, हिशोब नियमितपणे ठेवले जातात. "मैत्री"मध्ये सर्व व्यवहार पारदर्शक आणि सामाजिक उत्तरदायित्व लक्षात घेउन व्हावेत अशी परंपरा आहे. सातत्याने कामाविषयी देणगीदारांना कळवले जाते आणि आवाहन केले जाते. मदत नियमितपणे मिळण्यासाठी दैनिक वर्तमानपत्रांची मदत घेतली जाते.

**"मैत्री" मध्ये येण्यासाठी स्वयंसेवक होऊन काम करणे म्हणजेच "मैत्री"चे सभासद होणे.** "मैत्री" चे सात स्वयंसेवक हेच विश्वस्त आहेत. विश्वस्त न्यासाकडे जमलेल्या देणग्यांमधून एक रुपया ही न घेता नियमित सभा घेऊन कामावर आणि हिशोबावर देखरेख ठेऊन आवश्यक त्या जबाबदाऱ्या पार पाडतात. मेळघाटमधे देखील स्वखर्चाने जातात. "मैत्री" चे स्वयंसेवक ही "मैत्री" ची खरी ताकद आहे.



**"मैत्री" कडून सामाजिक कामाची प्रेरणा घेऊन अनेकजण सामाजिक कामांशी कायमचे जोडले गेले आहेत.**

**मेळघाटातल्या कोरकू आदिवासी घरातले बालमृत्यू वाचवणे हीच आपल्या कामाची सुरुवात.** मेळघाट हा महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्याच्या दोन तालुक्यामधला एकूण ४०१२ चौ. किमी.चा भाग. व्याघ्र प्रकल्पाचा भाग असलेल्या या मेळघाटात वीज, रस्ते पोहोचलेले नाहीत आणि त्यामुळेच इतर आवश्यक सोयी-सुविधाही नाहीत.

१९९७ पासून सातत्यानं आजवर मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू आणि ह्यांवर आपण काम करतो आहोत. आपला प्रत्येक प्रकल्प लोकांची गरज, आवश्यक ती मदत आणि स्वयंसेवकांची तयारी यांतून उभा राहिला आहे. जिथे कोणीही पोहोचत नाही अशा ठिकाणी आपण पोहोचावं या विचारातून मेळघाटमधल्या मोजक्या गावात आपण काम सुरु केलं.

मेळघाटातील दुर्गम गावात प्रत्यक्ष राहून कोरकू आदिवासीं सोबत प्राथमिक आरोग्य, शिक्षण सुधारणा, शेती सुधारणा अशी कामे सातत्याने होत आहेत. स्थानिक युवक तसेच प्रशिक्षित आरोग्य मैत्रिणी या कामासाठी सोबत आहेत. सुरुवातीची काही वर्षे लोकांशी "मैत्री" करत, त्यांना समजून घेत आपण आरोग्य, शिक्षणाचं काम सुरु केलं. आता मेळघाटातील २८ गावांत मेळघाट मित्र म्हणून आपले काम सुरु आहे. मेळघाटातल्या या गावात आता कुटुंब नियोजन, शाळा प्रवेश अशा कामात वेळ द्यावा लागत नाही. गावातील लोक प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन उपचार घेऊ लागले आहेत. बंद पडलेली एस.टी बससेवा सुरु करणे, रोजगार हमीची कामे मिळवणे, रस्ता दुरुस्ती करुन घेणे यासाठी लोकच आपणहून पुढे येतात, त्यासाठी "मैत्री" च्या मेळघाट मित्रांच्या संपर्कात असतात.

**"मैत्री" स्वत:शी "मैत्री" सर्वांशी...** मागेल त्याला सवडी प्रमाणे समाजकार्याची संधी देण्यासाठी "मैत्री" मदत करते. मनातील कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी देखील "मैत्री" चे स्वयंसेवक सोबत असतात. देशातच नव्हे तर परदेशात राहूनही

"मैत्री" हा विश्वस्त न्यास, १७ वर्षे अनेक स्वयंसेवक, देणगीदार व्यक्ती, गट, संस्थांच्या मदतीमुळे सामाजिक काम करत आहे.

सातत्याने देणगी स्वरूपात मदत जमा करणारे अनेक जणं "मैत्री" सोबत आहेत. जगभरातील स्वयंसेवक "मैत्री"च्या निमित्ताने मेळघाटाशी जोडले गेले आहेत.

रुईपठार गावात सौर उर्जेवर चालणारा पंप सुरु होऊन गेली ५ वर्ष गावातच पाणी मिळत आहे. तसेच आता गावात आणि घरातही सौर दिवे आले आहेत. मेळघाटातील "मैत्री" चे काम सरकारी अधिकारी एक पथदर्शक प्रकल्प म्हणून पहाण्यासाठी सुचवतात.

"मैत्री" च्या चिलाटी येथील कार्यालयात सौर उर्जेवर संगणक आणि दिवे सुरु झाले आहेत. आणखी काही गावात सौर उर्जेचा उपयोग करून काही प्रकल्प उभे करण्याची योजना आहे. त्यासाठी आर्थिक मदतीची तसेच स्वयंसेवकांची गरज आहे.

**"मैत्री" चे उपक्रम:**

**मेळघाट मित्र**: पावसाळ्यातील बालमृत्यू व कुपोषण रोखण्याची, आरोग्य शिक्षणाची धडक मोहिम आणि वार्षिक स्पर्धांनी होणारा बालक दिन असे उपक्रम "मैत्री"च्या सुरुवातीपासून मेळघाटात होतात. या सातत्यपूर्ण प्रयत्नांनी आरोग्य, शेती, रोजगार, जागरुकता अशा अनेक बाबींवर मेळघाट मित्रांनी ठळक परिणाम साधला आहे.

**मंगळवार बैठक:** १७ वर्षांपासून प्रत्येक मंगळवारी संध्याकाळी ६.३० ते ७.३० कमलानेहरू पार्क मध्ये हिरवळीवर "मैत्री"चे स्वयंसेवक जमतात. "मैत्री"च्या कामांविषयी चर्चा आणि नव्याने येणाऱ्यांची ओळख असे बैठकीचे स्वरूप असते. सर्वांसाठी बैठक खुली आहे.

**आपत्ती तिथे "मैत्री"**: गुजरात भूकंप, तामिळनाडूतील त्सुनामी, कोकण, मराठवाडा, बिहार, उत्तरप्रदेशमधील पूर, लेह तसेच उत्तराखंड आपत्तीत "मैत्री""च्या प्रशिक्षित स्वयंसेवकांनी मदत केली आहे.

"मैत्री" हा विश्वस्त न्यास, १७ वर्षे अनेक स्वयंसेवक, देणगीदार व्यक्ती, गट, संस्थांच्या मदतीमुळे सामाजिक काम करत आहे.

**"मैत्री" रद्दीतून सद्दी:** मोठया गृहरचना संस्थांमधून "मैत्री"ची माहिती देऊन, घराघरातून रद्दी जमा करून तिच्या विक्रीतून "मैत्री"च्या मेळघाट प्रकल्पासाठी निधिसंकलन. या उपक्रमात १० सोसायट्या, काही कार्यालये आणि व्यक्ती सामिल झाल्या आहेत. यात अधिक सोसायट्या सामिल होण्यासाठी संपर्क साधावा. पुण्यातील दोन शाळा दरवर्षी विद्यार्थ्यांकडून रद्दी संकलन करुन "मैत्री" कडे निधी सोपवतात.

**"मैत्री" जत्रा:** आपल्या आनंदासाठी कलाकुसरीच्या वस्तू तयार करणाऱ्या स्वयंसेवकानी एकत्र येऊन त्याचे प्रदर्शन व विक्री करुन काही निधी "मैत्री" साठी देणे असा हा उपक्रम गेली चार वर्ष सुरु आहे.

**"मैत्री" लघुचित्रपट महोत्सव**: तीन वर्षांपासून २ ऑक्टोबर हा दिवस लघुचित्रपट पाहण्यासाठी ठरवला आहे. एकत्र बसून विविध विषयांवरील लघुपट पाहून त्यावर सविस्तर चर्चा करणे असा हा उपक्रम आहे.

**सर्वात आधी शिक्षण:** "मैत्री"चे स्वयंसेवक गेली तीन वर्ष पुण्यातील ग. रा. पालकर शाळेत नियमितपणे गणित आणि विज्ञान हे विषय सोप्या पध्दतीने शिकवतात. तसेच पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये देखील हसत-खेळत इंग्रजी शिकवण्याचा उपक्रम नुकताच सुरु झाला आहे.

**""मैत्री""ला अशा प्रकारे आर्थिक मदत देता येईल:**

- मेळघाटातील १३ आरोग्य मैत्रीणींचे मासिक मानधन प्रत्येकी रू. ५००/-
- एका मुलाचा आरोग्य व शिक्षणाचा वर्षाचा खर्च रु. ५,०००/-
- मेळघाटात कामासाठी असलेल्या दुचाकीचा मासिक खर्च रू. ५,५००/-
- ३ पूर्णवेळ कार्यकर्त्यांचे मानधन प्रत्येकी रू. १९,५००/-
- वाढदिवस, स्मृतीदिनाच्या निमित्ताने ऐच्छिक देणगी.
- मोठ्या सोसायटीत नियमितपणे रद्दी जमा करून निधी संकलन.

"मैत्री" हा विश्वस्त न्यास, १७ वर्षे अनेक स्वयंसेवक, देणगीदार व्यक्ती, गट, संस्थांच्या मदतीमुळे सामाजिक काम करत आहे.

**देणगी: “मैत्री” या नावाने चेक / रोख देणगी म्हणून देता येईल.**

**ऑनलाईन देणगी: एच.डि.एफ.सी. बँक, खाते क्रं: 01491450000152**

**आय एफ़ एस कोड: RTGS/NEFT-HDFC0000149,**

**पॅन क्र. : AAATZ 0344 C**

**“मैत्री”साठी दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या ८०जी खाली करमुक्त आहेत.**

मैत्री

मैत्री स्वत:शी,
मैत्री सर्वांशी !

“मैत्री” हा विश्वस्त न्यास, १७ वर्षे अनेक स्वयंसेवक, देणगीदार व्यक्ती, गट, संस्थांच्या मदतीमुळे सामाजिक काम करत आहे.